**निवडसुची वर्ष २०२५-२०२६ (अतिरिक्त निवडसूची) मध्ये निवडश्रेणी उपजिल्हाधिकारी संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी संवर्गातील नियमित पदोन्नती कोटयातील रिक्त पदांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती व पदस्थापना देणेबाबत.....**

# महाराष्ट्र शासन

## महसूल विभाग

**शासन आदेश क्र.पदोन्नती-२०२५/प्र.क्र.१३३/आस्था-१ (ई-१८११३५४)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ०६ नोव्हेंबर, २०२६

**संदर्भ :-**

१. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एसएनटी-२०२०/प्र.क्र.९७/ई-१ अ, दि. ३१.१२.२०२०
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१
३. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एसएनटी-२०१७/प्र.क्र.२१/ई-१ अ, दि.०५.०७.२०२१
४. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/ कार्या.१२, दि. १४.०७.२०२१
५. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.ज्येसूची-२०२४/प्र.क्र.६१/ई-१ अ, दि. ०३.०१.२०२५.
६. सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्र. ईएसबी-११२६/प्र.क्र.१२९/आस्थामं (का-१३), दिनांक २४.०८.२०२६.
७. महसूल विभागाचे समक्रमांकाचे दि.०२.११.२०२६ रोजीचे पदोन्नती आदेश.

**<u>शासन आदेश</u> :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्रमांक ६ येथील दिनांक २४.०८.२०२६ रोजीच्या इतिवृत्तान्वये, आस्थापना मंडळ क्र. २ यांनी निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिका-यांची अपर जिल्हाधिकारी या पदोन्नतीच्या पदाकरीता पात्रता तपासून निवडसूची वर्ष २०२५-२०२६ (अतिरिक्त निवडसूची) मध्ये निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी एस २३-₹ ६७,७००- २,०८,७००/-) या संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी एस २५-₹७८,८००-२,०९,२००/-) या संवर्गात नियमित पदोन्नती कोटयातील पदांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे.

**०२.** शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि.१४ जुलै, २०२१ अन्वये "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर

सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१" निर्गमित झाली असून सदर अधिसूचनेतील परिच्छेद क्र.२ (२) (ग) अन्वये अपर जिल्हाधिकारी व निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी या संवर्गाला महसूली संवर्ग वाटप नियमावली लागू होत नाही.

**०३.** श्री.मस्के यांना अपर जिल्हाधिकारी संवर्गात संदर्भ क्र. ७ येथील आदेशान्वये पदोन्नती देण्यात आलेली आहे. आता आस्थापना मंडळाच्या शिफारशींनुसार व महसुल संवर्ग वाटप नियमावलीमधील परिच्छेद क्र. २(२)(ग) नुसार, खालील अधिकारी यांना सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविलेल्या पदावर, अपर जिल्हाधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी एस २५-₹७८,८००-२,०९,२००/-) या संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अपर जिल्हाधिकारी या पदावर पदोन्नत अधिका-याचे नाव | अपर जिल्हाधिकारी या पदावर पदोन्नतीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १. | **श्री. श्यामकांत नामदेवराव मस्के** | **(प्रपत्र बढती)**<br>**सहायक प्राध्यापक, डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती** |

**०४.** उपरोक्त पदावर संबंधित अधिकारी यांनी तात्काळ रुजू व्हावे .तसेच ते नवीन पदस्थापनेच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत e१.revenue@maharashtra.gov.in यावर ई-मेलद्वारे/ टपालाद्वारे शासनास त्वरित कळवावे.

**०५.** उक्त अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी या संवर्गात खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे :-

७.१ सदर तात्पुरती पदोन्नती ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. ०७.०५.२०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि. २५.०५.२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ व विशेष अनुमती याचिका क्र. २५१८१/२०१८ व त्यातील आय.ए.क्र. २५९०/२०१९ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

७.२ सदर तात्पुरती पदोन्नती ही मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०८७६/२०२१ व रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ यामधील आय.ए.(स्टॅम्प) क्र. १०९१०/२०२१ व १०९११/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०९०९/२०२१ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

७.३ सदर तात्पुरती पदोन्नती ही दिव्यांग आरक्षणासंदर्भात मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.स्टँप ६८१९/२०२१ व अन्य यांचिकांवर मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

७.४ सदर तात्पुरती पदोन्नती ही मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेले मूळ अर्ज क्र. २३६/२०२१ (श्री. सूर्यकृष्णमूर्ती कोतापल्ली विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) व क्र. २३७/२०२१ (श्री. अजिंक्य पडवळ विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर), मुळ अर्ज क्र. १५२२/२०२४ (श्री. सूर्यकृष्णमूर्ती कोतापल्ली विरुध्द महाराष्ट्र शासन), मुळ अर्ज

क्र. २३२/२०२५ (श्रीमती ज्योती लाटे-कदम विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर), मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथील रिट याचिका क्र. ५८२१/२०२३, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील सिव्हील रिट याचिका क्र. १९७/२०२५ (महाराष्ट्र राज्य तहसिलदार आणि नायब तहसिलदार संघटना) या न्यायालयीन प्रकरणांमध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

**०६.** सदर निव्वळ तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

**०७.** सदर निव्वळ तात्पुरती पदोन्नती ही सेवा ज्येष्ठतासूचीसंदर्भात न्यायालयात प्रलंबित असलेल्या सर्व याचिकेतील न्यायाधिकरणाच्या अंतिम निर्णयास अधीन राहतील.

**०८.** महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती)नियम, १९७९ मधील नियम ३२ मधील तरतुदीनुसार, अपर जिल्हाधिकारी या संवर्गात पदोन्नत झालेल्या अधिका-यांनी पदोन्नतीचे पद धारण केल्याच्या तारखेपासूनच त्यांना पदोन्नतीच्या पदाचे लाभ देय ठरणार आहेत. तसेच पदोन्नत पदाचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासूनच (वेतनश्रेणी एस २५-₹७८,८००-२,०९,२००/-) ही वेतनश्रेणी लागू होईल.

**०९.** सदर पदोन्नतीनंतर प्रतिनियुक्तीच्या पदावर रुजू होणा-या अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ व शासन निर्णय दिनांक १६.०२.२०१८ मधील प्रतिनियुक्तीच्या धोरणातील विहित अटी व शर्ती लागू राहतील.

**१०.** सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६११०६१८३६५२५५४८ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.11.06 18:37:28 +05'30'

**(महेश वरुडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती.

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रीडा व अल्पसंख्यांक विकास) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. संबंधित विभागीय आयुक्त
९. संबंधित जिल्हाधिकारी
१०. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२ मुंबई /नागपूर
१२. संबंधित अधिदान व लेखा अधिकारी/निवासी लेखा अधिकारी

१३. सबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
१४. संबंधित अपर जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्तांमार्फत)
१५. सह सचिव (कार्यासन १३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
१६. उप सचिव (आस्था-०१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. नियंत्रक अधिकारी/ आहरण व संवितरण अधिकारी, महसूल विभाग,मंत्रालय, मुंबई
१८.निवडनस्ती (कार्यासन आस्था-०१), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

********